महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राळेगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील आदिवासी बहुल जळका- वरणा रस्त्याच्या कामात लाखो रुपयांचा गैरप्रकार झाल्याबाबत

(१) १३७४७ (०९-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील आदिवासी बहुल जळका- वरणा रस्त्याच्या कामावर पंधरा लाख रुपये कागदोपत्री खर्च झाले असल्याचे दाखवून सदर रस्त्याचे काम दोन वर्षापुर्वीच झाल्याची नोंद बांधकाम विभागात असून सध्या कार्यरत अधिकारी रस्त्याचे काम झालेच नाही असे सांगत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांनी एक समिती गठन केली असून सदर प्रकरणाबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) ते (४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ पाटबंधारे विभागांतर्गत देखभाल व दुरुस्तीच्या ८ कोटीचे दायीत्वबाबत

(२) १३७९७ (०८-०४-२०१५). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ पाटबंधारे विभागांतर्गत देखभाल व दुरुस्तीच्या ८ कोटीचे दायीत्व कार्यकारी अभियंत्यांनी निर्माण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आठ कोटीचे दायीत्व निर्माण करताना या करिता सक्षम स्तरावरुन परवानगी कार्यकारी अभियंताने घेतली आहे काय,

(३) नसल्यास, त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१६) :(१) होय.

सन २०१४-१५ अखेर रु. २.९९ कोटींची कामे पूर्ण झाली असून त्यांची देयके प्रलंबित आहेत.

(२) याबाबत क्षेत्रीय स्तरावर तपासणी करण्यात येत आहे.

(३) तपासणीअंती कार्यवाही करण्यात येईल.

नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील अनेक पदे रिक्त असल्याबाबत

(३) १४४७९ (०८-०३-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख आदी अनेक पदे एक वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून रिक्त असल्यामुळे जि.प.प्राथमिक शाळेत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना अध्ययनात शिक्षकांअभावी अडचणी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, प्राथमिक शिक्षक व अन्य रिक्त पदांवर नेमणुका करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२६-०२-२०१६) :(१), (२), (३) व (४) शिक्षक संवर्गाचे संच मान्यतेबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ९०२६/२०१४ दाखल झालेली आहे. या योचिकेवर दि. ३१ डिसेंबर, २०१४ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये न्यायालयाने जैसे थे (Status-quo) आदेश पारीत केले होते. त्यामुळे राज्यात पदभरती करता येत नव्हती. आता मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशनानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) स्तरावर संच मान्यतेची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषदा, महानगरपालिका व नगरपालिका) व खाजगी अनुदानित शिक्षण संस्थामधील विविध जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षक व आंतरजिल्हा बदली पात्र शिक्षकांच्या सेवा ज्या शाळांमध्ये पटसंख्येनुसार शिक्षक आवश्यक आहेत. अशा शाळांमध्ये उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सर्व समावेशक अशी कार्यवाही शालेय शिक्षण विभागाच्या स्तरावर सुरु आहे. या कार्यवाहीनुसार रिक्त पदे भरण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

गोंदिया जिल्ह्यातील शिरपूर धरण, हाजराफाल, ईटीयाडोह धरणग्रस्त शेतक-यांच्या बेरोजगार मुलांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

(४) १५६९८ (०९-०४-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील शिरपूर धरण, हाजराफाल, ईटीयाडोह धरण या मध्ये अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित धरणग्रस्त शेतक-यांची बेरोजगार मुले प्रमाणपत्र घेऊन शासनाकडे नौकरी मागत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणग्रस्त शेतक-यांच्या बेरोजगार मुलांना शासन शासकीय सेवेत कधी सामावून घेणार आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) होय.

(२) होय.

(३) धरणग्रस्त शेतक-यांच्या एका संबंधिताला सन १९९२ मध्ये जलसंपदा विभागाद्वारे शासकीय नोकरी देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ/मंत्रालय, मुंबई-३२ दि.२७/१०/२००९ अन्वये आता प्रकल्पग्रस्तांची भरती जाहिरात देवून व उमेदवाराची पात्रता तपासून स्पर्धा परिक्षेद्वारे गुणवत्तेच्या आधारे करण्याचे आदेश आहेत.

गोंदिया जिल्हा परिषदेत लघु पाटबंधारे विभागात झालेला गैरव्यवहार

(५) १५७७९ (०९-०४-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हापरिषदेत लघुपाटबंधारे विभागाने जि.प. मध्ये, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ मध्ये शासनाची मंजूरी न घेता अत्याधिक कामाचे वाटप करण्यात आले. जेणे करुन शासनावर आणि जि.प. वर कोट्यवधी रुपयांचा भार पडला, हे खरे आहे काय

(२) तसेच, माननीय ग्रामविकास मंत्री यांनी सन २०१४ नागपूर अधिवेशनात ही बाब अंशतः खरे सांगुन संबंधितांचे विरुध्द चौकशी सुरु असल्याचे माहिती दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी अनियमितता करणा-या संबंधित अधिका-यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :(१) होय.

(२) होय.

(३) होय. अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नागपूर यांनी विभागीय चौकशी केली आहे.

(४) विभागीय चौकशीनुसार संबंधित अधिकाऱ्या विरुध्द लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नागपूर यांच्या दिनांक ७-५-२०१५ च्या पत्रान्वये शिक्षा आदेश पारित केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यामधील धरणातील पाणीसाठ्याने तळ गाठलेला असल्याने पाणी टंचाईवर मात करण्याबाबत

(६) १७८५६ (१४-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यामधील धरणातील पाणीसाठ्याने तळ गाठलेला आहे मागील वर्षाच्या तुलनेत अवघा २२ टक्के पाणीसाठी धरणांत शिल्लक असल्याने जिल्ह्यावर पाणी टंचाईचे संकट आले असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील पाणी टंचाईवर मात करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१६) :(१) नाही.

ठाणे जिल्ह्यातील धरणातील एप्रिल, २०१४ मधील उपलब्ध पाणीसाठ्याची टक्केवारी ४५.९८% इतकी होती व एप्रिल, २०१५ मधील उपलब्ध पाणी साठ्याची टक्केवारी ४०.१३% इतकी आहे.

(२) ठाणे जिल्हयातील उल्हास नदी खोऱ्यातील पाण्याचे नियोजनानुसार सन २०१४-१५ मध्ये १४% पाणी कपात दि. ३/११/२०१४ पासून लागु केली होती. सन २०१५ च्या पावसाळ्यात देखील कमी पाणी प्राप्त झाले असल्यामुळे पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी पुरविण्यासाठी १/११/२०१५ पासून २८ ते ३०% कपात लागू करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

दोडामार्ग तालुक्यातील तिलारी प्रकल्पाच्या जलाशयात सुरु असलेले अनधिकृत बोटींग

(७) १९४९० (१४-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडामार्ग तालुक्यातील तिलारी प्रकल्पाच्या जलाशयात अनधिकृत बोटींग सुरु असल्यामुळे प्रकल्पाच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून अनधिकृत बोटींग बंद करण्याबाबत प्रकल्पाच्या अधिका-यांकडे ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करुन कार्यवाही करावी अशी मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तिलारी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राबाहेर असणा-या शेकडो एकर जमिनी परप्रांतीय केरळीयन लोकांनी विकत घेतल्या असून या जमिनीकडे जाण्या येण्यासाठी तिलारीचा जलाशय पार करावा लागत असल्याने तिलारी प्रकल्पाच्या पाण्यात त्यांनी केवळ दोनच स्पिड बोटींना शासनाची परवानगी असताना अनेक स्पिड बोटी सुरु केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तिलारी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात बाहेर वास्तव्य करणाऱ्या केरळीयन लोकांची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरुपाची असल्याचे निदर्शनास येणे, प्रकल्पावर असलेले सीसी टीव्ही कॅमेरे अनेक महिने बंद असणे त्यामुळे प्रकल्पाच्या ठिकाणाहून पाण्याच्या पलिकडे कोण कोण ये-जा करते यांचे चित्रण होत नसल्याने प्रकल्पाच्या बाहेरील परिसरात अनेक अवैद्य व्यवसाय सुरु झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामस्थांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

शेतीसाठी बुडीत क्षेत्रापलीकडच्या जमिनीकडे जाण्यासाठी दोन अधिकृत व दोन अनधिकृत बोटींचा वापर सुरु आहे. तथापि त्यामुळे प्रकल्पाच्या सुरक्षिततेला कोणताही धोका उद्भवलेला नाही. तसेच अनधिकृत बोटिंग बंद करण्याबाबत प्रकल्प अधिकाऱ्यांकडे कोणत्याही ग्रामस्थांनी तक्रार किंवा मागणी केलेली नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

तिलारी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राबाहेर असणाऱ्या जमिनी खाजगी लोकांनी खरेदी केलेल्या आहेत. त्यापैकी दोघांनी जलाशयात बोट वापरण्याचा अधिकृत करारनामा केला आहे. याशिवाय दोन बोटींचा जलाशयामध्ये विनापरवानगी वापर सुरु आहे. त्यांना आवश्यक करारनामा करण्यास कळविले असून करारनामा न केल्यास त्यांच्या बोट वापरास प्रतिबंध करणे नियोजित आहे.

(३) बुडीत क्षेत्रालगतच्या लोकांची पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरुपाची असल्याचे व त्यांचे अवैध व्यवसायबाबत जलसंपदा विभागाकडे माहिती नाही. सी.सी.टी.व्ही कॅमेरे दुरुस्त करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

तळंबा केरवडे (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील मोठा पाटबंधारे प्रकल्पाच्या कामाच्या सद्य:स्थितीबाबत

(८) १९५१३ (१७-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळंबा केरवडे नजिक (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) मोठा पाटबंधारे प्रकल्पच्या कामास केंद्रीय जल आयोगाची व वन जमिनी संपादित करण्याकरिता वन विभागाची मान्यता प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे व सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, अदयाप केंद्रीय जल आयोगाची व वन विभागाची मान्यता प्राप्त झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(४) तसेच सदर प्रकल्पाला मुळ प्रशासकीय मान्यता १९८१ मध्ये देताना प्रकल्पाच्या खर्चाची किंमत ७२३७.९१२ लक्ष रुपये होती ती सन २००८ मध्ये ८१६६४.५५ एवढी झालेली असतानाही सन २०१५ साल आले तरी प्रकल्पाच्या कामाची सुरुवात शासन स्तरावर करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१६) :(१) अंशत: होय, केंद्रीय जल आयोगाची मान्यता प्राप्त आहे. ६२३ हे. वन क्षेत्र निर्वनीकरणाची मान्यता अद्यापी अप्राप्त आहे.

(२) तळंबा प्रकल्पाचे काम सन २००१-०२ मध्ये सुरु करण्यात आले असून धरणाचे २८% माती काम पूर्ण झाले आहे. कालव्याचे काम सुरु झालेले नाही. मे, २०१५ अखेर प्रकल्पावर रुपये १४३.४२ कोटी इतका खर्च झाला आहे. निर्वनीकरण प्रस्तावास केंद्रीय पर्यावरण व वन विभागाचे मान्यते अभावी प्रकल्प पूर्ण करण्याचा निश्चित कालावधी नमूद करता येत नाही.

(३) वृक्षतोड, वन्यजीवावर होणारे परिणाम इ. बाबी विचारात घेऊन ६२३ हेक्टर वनक्षेत्राच्या सुधारित निर्वनीकरण प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यास वन व महसूल विभागाने असमर्थता दर्शविली आहे.

(४) तळंबा प्रकल्पाच्या कामास सन २००१-०२ मध्ये सुरुवात करण्यात आली असून धरणाचे मातीकाम २८% पुर्ण झाले आहे. भूसंपादन व पुनर्वसनाची कामे प्रगतीपथावर आहेत. तथापि वनक्षेत्र निर्वनीकरणाचा प्रस्ताव पारित होईपर्यंत प्रकल्पाचे काम बंद ठेवण्यात आले आहे.

(५) ६२३ हेक्टर वनक्षेत्राच्या निर्वनीकरणाच्या प्रस्तावास अद्यापी मान्यता मिळालेली नाही.

हातदे-मिळंद (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील गावाला जोडणारा साकव अत्यंत धोकादायक झाल्याबाबत

(९) १९६०७ (०३-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातदे-मिळंद (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथील गावाला जोडणारा साकव अत्यंत धोकादायक झाला असून साकवावरुन विद्यार्थी, ग्रामस्थांना प्रवास करणे अत्यंत हालाखीचे होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास अनेकवेळा मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) होय.

(२), (३) व (४) सन २००२-०३ पूर्वी जिल्हा परिषदांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून साकव दुरुस्तीसाठी ३०५४ मार्ग पूल परिरक्षण व दुरुस्ती या योजनेत्तर संवर्गाखाली साकव दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध होत होता. परंतु सन २००२-२००३ पासून संवर्ग अ ब क ड मध्ये साकव ही बाब अंतर्भूत होत नाही.

सन २०१२-१३ या वर्षापासून जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांची देखभाल दुरुस्ती हा योजनेत्तर कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय दि.१०.०९.२०१२ अन्वये जिल्हा परिषदेमार्फत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीकरीता निधीचे वाटप करण्याबाबत कार्यपध्दती विशद केली आहे. त्यानुसार या योजनेत्तर कार्यक्रमासाठी गट अ ब क ड तयार केले असून गट ड मधील अन्य व संकिर्ण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषदेने साकव दुरुस्तीचे काम करण्याचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु.३७३३.८२ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण रु.७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रु.१७००.६३ लक्ष असा एकूण रु.६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

जिल्हा परिषदेकडील इमारतीचे (जि.रत्नागिरी) निर्लेखन करण्याचा अधिकार सार्वजनिक बांधकाम ऐवजी जिल्हा परिषदेकडेच देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत

(१०) १९६११ (१४-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेकडील इमारतीचे (जि.रत्नागिरी) निर्लेखन करण्याचा अधिकार सार्वजनिक बांधकाम ऐवजी जिल्हा परिषदेकडेच देणेबाबतचा प्रस्तावावर शासन स्तरावर निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या निर्लेखनाचे प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविल्यानंतर सुमारे दोन ते तीन वर्षे मंजूरीअभावी पडून राहतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावांना वेळेत मंजूरी मिळत नसल्याने जिल्ह्याचा विकास खुंटत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार शासन स्तरावर तात्काळ पूर्वीप्रमाणेच जिल्हापरिषदेकडे अधिकार देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

भडगांव (जि.जळगांव) येथील पाटबंधारे विभागातील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या दुरुस्तीबाबत

(११) १९७४४ (१४-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव (जि.जळगांव) येथील पाटबंधारे विभागातील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची सुमारे १५ वर्षापासून दुरुस्ती झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच गिरणा पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृहांची दुरुस्ती अभावी अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या इमारतींच्या दुरुस्तींचे प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविण्यात येऊनही अद्यापपर्यंत यावर निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या शासकीय इमारतींच्या दुरुस्तीकरिता शासन निधी उपलब्ध करुन देणार आहे काय,
(५) निधी उपलब्ध केला असल्यास, सदर काम किती कालावधीत पूर्ण करण्याचे अपेक्षित आहे?

श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१६) :(१) होय, अंशत: खरे आहे.

भडगांव जिल्हा जळगांव येथील पाटबंधारे वसाहतीतील कर्मचारी निवासस्थानांची सुमारे १५ वर्षापासून विशेष दुरुस्ती (मोठी स्वरुपातील दुरुस्ती) झालेली नाही. तथापि राहण्यासाठी आवश्यक असलेली काही निवासस्थानांची किरकोळा स्वरुपाची दुरुस्ती करण्यात आली आहे.
(२) गिरणा पाटबंधारे विभागांतर्गत ६ विश्रामगृह असून त्यापैकी एरंडोल येथील विश्रामगृह हे एंरडोल प्रांत कार्यालयासाठी हस्तांतरीत करण्यात आले आहे. तसेच इतर सर्व विश्रामगृहे सद्य:स्थितीत सुस्थितीत आहेत.
(३) व (४) गिरणा पाटंबधारे विभागांतर्गत भडगांव येथील वसाहतीमधील कर्मचारी निवासस्थाना संदर्भात दुरुस्तीचे अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालु आहे.

सदर शासकीय इमारतींच्या दुरुस्तीकरीता शासनाच्या प्रचलित धोरणानुसार परिरक्षण व दुरुस्ती अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो व त्यातून ही कामे आवश्यकतेनुसार करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील मांजरा प्रकल्पाच्या जलाशयासाठी मौजे-पिपळगाव (टोणगा) (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील असंख्य शेतक-यांना सोयी सुविधा मिळण्याबाबत

(१२) २०२०६ (१७-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील मांजरा प्रकल्पाच्या जलाशयासाठी मौजे-पिपळगाव (टोणगा) (ता.कळंब,जि.उस्मानाबाद) येथील श्री.शिवाजीप्रभू जगंम व अन्य असंख्य शेतक-यांच्या शेत जमिनी तसेच घरेदारे व अन्य मालमत्ता संपादित करुन आजमितीस ५ वर्षाहून अधिक कालावधी लोटलेला असतानाही, सदरहू शेतक-यांना संपादित केलेल्या जमिन, घरेदारे व अन्य मालमत्तेस नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) याप्रकरणी जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद येथील दावा क्र.आरसीए ७३/९९ चा निकाल दिनांक २१ मार्च, २०११ रोजी होवून आवार्ड देण्याचे आदेश झालेले असतानाही, त्याची अंमलबजावणी झालेली नाही तसेच शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर, १९७२ प्रमाणे भूभाडेही आजमितीस देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) सदरहू प्रकल्पग्रस्तांना देय असलेला मोबदला आजमितीस होणा-या व्याजासह सर्व रक्कम लवकरात लवकर अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

मांजरा प्रकल्पांतर्गत संपादीत करण्यात आलेल्या जमीनी, घरे/मालमत्ता यांचा निवाडा जुलै १९७८ मध्ये जाहीर होऊन मावेजा वाटपाची कार्यवाही करण्यात आलेली आहे, असे क्षेत्रिय अहवालानुसार दिसते.

तथापि श्री. शिवाजी प्रभू जंगम यांच्या मालकीच्या ३३ फूट * ३३ फूट खुल्या जागेची संपादन आवार्डमध्ये त्यांचे नावासमोर रक्कम दर्शविलेली नाही. त्यामुळे त्यांना कोणतीच भरपाई देण्यात आली नाही.

(२) होय.

(३) सदर जमिनीची सरळ खरेदी करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यामध्ये सन २०१५-१६ मध्ये १०० टक्के अनुदानावर फळबाग योजना राबविण्याबाबत

(१३) २०३१० (१७-०८-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये राष्ट्रीय महात्मा गांधी रोजगार हमी योजना अगर महाराष्ट्र रोजगार हमी योजना अंतर्गत १०० टक्के अनुदानावरती फळबाग योजना राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय,

(२) असल्यास, त्याखाली चालू वर्षामध्ये किती हेक्टर जमिनीवरती हा प्रकल्प राबवला जाणार आहे,

(३) असल्यास, त्यासाठी अंदाजे किती खर्च करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सोलापूर जिल्ह्यासाठी फळबाग योजना राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१६) :(१) होय.

(२) सन २०१५-१६ मध्ये प्रति कृषि सहायक १० हेक्टर याप्रमाणे फळबाग लागवडीचे लक्षांक देण्यात आलेले आहेत. त्यानुसार मनरेगा अंतर्गत जेवढे पात्र लाभार्थी संमती देतील त्यांना योजनेत समाविष्ट करुन घेण्यात येईल.

(३) मनरेगा अंतर्गत फळपिकनिहाय जशी लागवड होईल त्यानुसार फळपिकाच्या मापदंडा प्रमाणे १०० टक्के अनुदान तीन वर्षाच्या कालावधीमध्ये देण्यात येईल.
(४) सोलापूर जिल्ह्यासाठी ५३६० हेक्टरचा लक्षांक देण्यात आलेला आहे. सोलापूर जिल्ह्यात नरेगा अंतर्गत सन २०१५-१६ साठी १९५० हेक्टर क्षेत्रास तांत्रिक मान्यता व ५१७ हेक्टर क्षेत्रास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाडा तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

(१४) २०७४९ (१४-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील चिंचघर ते बिलावली, चिंचघर ते देवघर, डाकिवली फाटा ते केळठण, निंबवली मुसारणे रस्ता, उघाटरस्ता, विजयगड या रस्त्यांवर खड्डे पडले असून सदरचे रस्ते दुरुस्त करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबधित अधिकाऱ्यांकडे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे रस्ते तातडीने दुरुस्त करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रश्नाधीन रस्त्यांमधील चिंचवली बिलावली रस्ता, उचाट रस्ता व विजयगड रस्ता या रस्त्यांच्या नादुरुस्त लांबीतील खड्डे भरण्याचे काम १३ वा वित्त आयोग (पंचायत समिती स्तर) अंतर्गत पूर्ण करण्यात आले आहे. चिंचघर ते देवघर या रस्त्याचे खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे. तसेच मुसारणे रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम मैलमजुरांमार्फत करुन रस्ता वाहतुकीस योग्य करण्यात आला आहे.

डाकीवली फाटा ते केळठण हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असून सदर रस्त्यावर पडलेले खड्डे डांबरमिश्रित खडीने भरण्याबाबतचा कार्यक्रम मंजूर असून निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

श्रीमांदा, पाथर्डी आणि कर्जत येथील पंचायत समितीच्या इमारतींची कामे पूर्ण झाली असून मंजूर निधी खर्च करण्यास विलंब झाल्याने देयके प्रलंबित असल्याबाबत

(१५) २०७८३ (१७-०८-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रीमांदा, पाथर्डी आणि कर्जत येथील पंचायत समितीच्या इमारतींची कामे पूर्ण झाली असून मंजूर निधी खर्च करण्यास विलंब झाल्याने १ कोटी रुपयाची

देयके दोन वर्षापासून राज्य सरकारच्या अर्थ विभागाकडे प्रलंबित असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद पातळीवरुन पाठपूरावा करुनही हा निधी खर्च करण्यास परवानगी मिळत नसल्याने काम करणारे ठेकेदार अडचणीत आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२९-०२-२०१६) :(१) अंशत: होय.

(२) व (३) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा व पाथर्डी पंचायत समितीच्या बांधकामावरील अखर्चित निधी सन २०१५-१६ मध्ये खर्च करण्यास दिनांक २९.०५.२०१५ च्या पत्रान्वये परवानगी देण्यात आल्यानुसार श्रीगोंदा व पाथर्डी पंचायत समितींच्या कामावरील प्रलंबित देयके ठेकेदारास अदा करण्यात आलेली आहेत. कर्जत पंचायत समितीचा सन २०११-१२ या वर्षातील अखर्चित निधी सन २०१५-१६ मध्ये खर्च करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यास मान्यता देण्यबाबतची कार्यवाही शासनस्तरावर स्वतंत्रपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कर्जत (जि.रायगड) येथील लघु पाटबंधारे विभागाच्या
कार्यक्षेत्रात येणारी अतिक्रमणे काढून टाकण्याबाबत

(१६) २०९६६ (१६-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथील लघु पाटबंधारे विभागाच्या कार्यक्षेत्रात येणारी अतिक्रमणे त्वरीत काढून टाकावीत असे आदेश मा.जलसंपदा राज्यमंत्री यांनी संबंधित पाटबंधारे विभागाला माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित विभागाकडून या आदेशाची अंमलबजावणी अद्याप करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंमलबजावणी न करण्याची कारणे कोणती,

(४) असल्यास, अतिक्रमणे हटविण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१८-०२-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

आंबेघर लघु पाटबंधारे योनजा ता.पेण, जि.रायगड योजने अंतर्गत कालव्यातील अतिक्रमणाबाबत दि. ३१.०१.२०१५ रोजी आलेल्या निवेदनावर मा.राज्यमंत्री जलसंपदा यांनी सूचना दिलेल्या आहेत.

(२) आंबेघर लघु पाटबंधारे योजना ता.पेणे, जि.रायगड योजनेंतर्गत कालव्यातील अतिक्रमणाबाबत दि.३१.०१.२०१५ रोजी आलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर भूमी अभिलेख कार्यालयाकडून संयुक्त मोजणी करुन किती क्षेत्रावर अतिक्रमण झाले आहे याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील खालापूर पंचायत समितीच्या इमारतीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(१७) २०९९७ (१७-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील खालापूर पंचायत समितीच्या इमारतीचे काम साडेचार वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पंचायत समिती इमारतीचे बांधकाम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) होय.

(२), (३) व (४) या कामी नियुक्ती केलेल्या ठेकेदारांच्या हलगर्जीपणामुळे व केलेल्या दिरंगाईमुळे तसेच, वेळेत पाठपुरावा न केल्यामुळे काम ठप्प झाले होते. सदरहु ठेकेदार मे.रचना कंस्ट्रक्शन उल्हासनगर यांची मक्तेदारी कंत्राट, करार-नामा दि.२१.१२.२०१३ मधील शर्त ३ (क) नुसार या अन्वये कामाचा ठेका रद्द करण्यात आला असून, सदर कामातील इसारा व सुरक्षा अनामत रक्कम रु.४,९६,२५५/- जप्त करण्यात आली आहे.

उर्वरीत काम पुर्ण करण्याच्या हेतूने बोलविण्यात आलेल्या निविदांमध्ये मे.साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन, ठाणे यांनी (५% जादा दराने भरलेली) निविदा/ठेका निश्चित करण्यात आला असून दि.२८.०२.२०१४ रोजी कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

अकोला जिल्हा परिषद शिक्षण विभागामध्ये नियमबाह्य कारभाराची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमण्याबाबत

(१८) २१४४० (१७-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषद शिक्षण विभागामध्ये नियमबाह्य कारभाराची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व काही ठिक असे चौकशी समितीने ठरवून चौकशी बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण विभागामध्ये अनेक पदे अतिरिक्त असून सीईओच्या आदेशानुसार चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत नव्याने चौकशी केव्हापासून सुरु होणार आहे व त्याचा कालावधी काय असणार आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२६-०२-२०१६) :(१), (२), (३) व (४) जिल्हा परिषद अकोला अंतर्गत शिक्षण विभागातील अपंग प्रमाणपत्राच्या आधारे देण्यात आलेल्या नियुक्ती मधील अनियमिततेबाबत तसेच इतर विषयाबाबत दिनांक ८ जुलै, २०१४ च्या स्थायी समितीमध्ये निर्णय झाल्यानुसार जिल्हा परिषदेने चौकशी समिती स्थापन केली होती. सदर चौकशी समिती ही नियमानुसार स्थापन केलेली नसल्याने व सदर समितीने अपूर्ण व मोघम स्वरुपाचा अहवाल सादर केला असल्याने विभागीय स्तरावरुन चौकशी समिती गठीत करण्यात आली असून, सद्य:स्थितीत कामकाज चालू आहे.

नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यात रस्त्यांची झालेली दुरवस्था

(१९) २२०८३ (१४-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यात रेवराल-धर्मापुरी, खरडा-रेवराल, नवरगाव-खंडाळा, ढोलमारा-नवरगाव जोडणारे रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गाच्या दुरूस्तीसाठी निधी मिळाला असतानाही दुरूस्ती व बांधकामाचे काम अद्यापपर्यंत सुरू झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्यांच्या रूंदीकरण व डांबरीकरणाचे काम सुरू करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबंधित विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर मागणीवर कोणता निर्णय घेतला आहे,
(६) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१), (२) रस्त्याच्या मंजूर लांबीतील दुरुस्ती व बांधकामाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५), (६) व (७) प्रश्नांकित चार रस्त्यांपैकी खरडा रेवराल व नवरगाव-खंडाळा हे दोन रस्ते हे सावजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहेत. खरडा रेवराल या प्रजिमा २५ च्या भाग रस्त्यांच्या ४.०० कि.मी. लांबीतील रस्ता सुधारण्याचे काम पुरहानी कार्यक्रमांतर्गत मंजूर आहे. तसेच नवरगाव-खंडाळा प्रजिमा २४ च्या भाग रस्त्याचे ३.०० कि.मी. चे काम मंजूर असून निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

रेवराल-धर्मापूरी या इजिमा क्र.१९८ च्या ०.४७५ कि.मी लांबीतील दुरुस्तीचे काम करण्यात आले असून २.०० कि.मी. लांबीचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर आहे. ढोलमारा-नवरगाव या ग्रामीण मार्ग क्र. ८१ च्या २.५० कि.मी लांबीतील माती व मुरुम स्तराचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

रेवराल-धर्मापूरी व ढोलमारा-नवरगाव या रस्त्यांच्या उर्वरित नादुरुस्त लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून करण्याबाबत जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

नाशिक शहराला पाणी पुरवठा करणा-या गंगापूर धरणाच्या सुरक्षितेबाबत

(२०) २२४४२ (१४-०८-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संपूर्ण नाशिक शहराला पाणी पुरवठा करणा-या आणि सिंहस्थ काळात सुमारे १ कोटी लोकांची पाण्याची सोय करणा-या गंगापूर धरणाच्या सिंहस्थ काळात सुरक्षितेसाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,
(२) धरणाच्या सुरक्षितेसाठी जलसंपदा विभागाने लेझर प्रोजेक्ट तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१६) :(१) गंगापूर धरणस्थळी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविलेले आहेत.

१) मुख्य धरणावर तसेच सांडवा/हेड रेग्युलेटर इ. ठिकाणी खात्याकडे उपलब्ध असलेल्या मजूर/चौकीदार यांच्या देखरेखीसाठी नेमणूका केलेल्या आहेत.

२) जलाशयाच्या बुडीत क्षेत्रालगत ज्या ठिकाणी पर्यटक जाण्याची शक्यता आहे. अशा ठिकाणी प्रतिबंधात्मक फलक लावण्यात आलेले आहेत.
(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कमखेडा ते वारुड (ता.शिंदखेडा, जि.धुळे) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

(२१) २२८०८ (१४-०८-२०१५). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कमखेडा ते वारुड (ता.शिदखेडा जि.धुळे) रस्त्याचे काम गेल्या २० वर्षापासून झाले नसल्यामुळे हुंबर्डे, कमखेडा, वडली, विकवेल या गावांच्या ग्रामस्थांना जवळपास १६ कि.मी. चा फेरा करुन बेटावद या मुख्य बाजारपेठेच्या गावाकडे जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमखेडा, हुंबर्डे, वडली विकवेल ही गांवे बेटावद जिल्हा परिषद गटातंर्गत येत असून एकाच गटातील गावांना जाण्यासाठी केवळ कमखेडा ते वारुड या ९ कि.मी. चा रस्ता तयार झाल्यास ग्रामस्थांची गैरसोय दुर होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे काम करण्याबाबत काय उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) प्रश्नांकित रस्त्याची एकूण लांबी ९ कि.मी. आहे. त्यापैकी १ कि.मी. रस्त्याच्या लांबीचे डांबरीकरणाचे काम सन २०१३-१४ या वर्षात झालेले आहे.

तसेच हुंबर्डे, कमखेडा, वडली, विकवेल या गावांच्या ग्रामस्थांना जवळपास १६ कि.मी. चा फेरा करुन बेटावद मुख्य बाजारपेठेच्या गावाकडे जावे लागते, ही बाब खरी नाही. त्या गावातील नागरीकांना बेटावद या मुख्या बाजारपेठेच्या गावाला जाण्याकरीता इतर तीन पर्यायी मार्ग उपलबध आहेत.

(२) ही बाब खरी आहे. परंतु परिसरातील नागरीकांना इतर तीन पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत.

(३) प्रश्नांकित कमखेडा ते वारुड हा रस्ता रस्ते विकास योजना २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग क्र.७५ असून सदर रस्त्याची एकूण लांबी ९.०० कि.मी आहे. त्यापैकी १.०० कि.मी. लांबीतील डांबरीकरणाचे काम सन २०१३-१४ या वर्षात झालेले असून उर्वरीत ८.०० कि.मी. मातीतून जाणारा कच्चा रस्ता आहे. सदर रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ अंतर्गत प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील कासगांव ते आंबळे खुर्द हा मंजूर झालेल्या रस्त्याचे काम अपुर्णावस्थते असल्याबाबत

(२२) २२८६९ (१४-०८-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील कासगांव ते आंबळे खुर्द हा सुमारे १९-२० वर्षापूर्वी मंजूर झालेल्या रस्त्याचे काम अद्यापही अपुर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता पूर्ण करण्याच्या मागणीसाठी आंबळे खुर्द तसेच साखरे येथील ग्रामस्थांनी दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन महसुल मंत्री, रोजगार हमी योजना मंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी ठाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी ठाणे जिल्हापरिषद, कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम तहसिलदार मुरबाड, इत्यादिंकडे तसेच यानंतर च्या कालावधीत अनेक वेळा संबंधितांकडे ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनीधींनी निवेदेन दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मंजूर झालेला रस्ता अद्यापही अपूर्ण राहण्याचे कारणे काय आहेत,

(४) सदरहू रस्त्याचे अपूर्ण बांधकाम केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) ठाणे जिल्हा परिषदेकडे प्रश्नांकित रस्त्याबाबत निवेदन प्राप्त झालेले नाही.

प्रश्नांकित मुरबाड तालुक्यातील मौजे कासगाव त आंबेळे खुर्द हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.८८ असून सदरील रस्त्याची एकूण लांबी २/२०० कि.मी. इतकी आहे. सदरचा रस्ता हा कासगाव मे आंबेळे खुर्द या गावांना जोडणारा ग्रामीण मार्ग आहे. सदर रस्त्याच्या ०/०० ते १/२०० कि.मी. लांबीतील खडीकरण डांबरीकरण तसेच कि.मी. १/२०० ते २/०० कि.मी.लांबीतील खडीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम उपविभाग मुरबाड यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

उर्वरित २/०० ते २/२०० कि.मी. एवढ्या रस्त्याची लांबी ही आंबेळे खुर्द ग्रामस्थांच्या मालकीची असून सदरील लांबीतील काम करता आलेले नाही. ग्रामस्थांचा जागा हस्तांतरणाचा वाद संपुष्टात आल्यानंतर सदरील रस्त्याचे काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

कासगाव हे गाव संगम कासगांव किसळ बळेगाव या प्रजिमा ने जोडलेले आहे. तसेच आंबेळे खुर्द हे गाव रस्ता रा.मा.क्र. २२२ ला जोडलेला आहे.

बाभुळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील डेहाणी उपसा सिंचन योजनेकरीता सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाकरीता ९० टक्के अनुदान देण्याबाबत

(२३) २३४८२ (१७-०८-२०१५). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील डेहाणी उपसा सिंचन योजनेकरीता सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाकरीता ९० टक्के अनुदान जलसंपदा विभागातर्फे व विदर्भ सधन एकात्मिक विकास योजनेअंतर्गत दिल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणतीही निविदा न मागविता करोडो रुपयांनी ठिबक संच पुरविण्याची कामे वेगवेगळ्या ठिबक संच निर्मात्यांना देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) ग्लोबल निविदा मागविल्या असल्यावर शासनाच्या या निधीची बचत होऊन चांगल्या प्रतिचे साहित्य शेतकऱ्यांना मिळाले असते, निविदा न मागविता या ठिबक संच पुरविणाऱ्या कंपन्यांना दिलेल्या कामाची चौकशी करुन संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) हे खरे नाही. योजनेच्या सर्वलाभार्थी ऐवजी पथदर्शी प्रकल्प म्हणुन योजनेच्या एकूण ६९६८ हे मधील टप्पा-१ च्या ४१२१ हे. पैकी २०१३ हे. क्षेत्रातील लाभार्थींना ठिबक सिंचनाकरीता ९० टक्के अनुदान जलसंपदा व विदर्भ सघन विकास महामंडळ व कृषी खात्यामार्फत देण्याचे निश्चित झाले आहे.

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम (VIIDP)	रु.७.३२ कोटी
२) राष्ट्रीय शास्वत शेती अभियान अंतर्गत (NMSA)	रु.१.१८ कोटी
३) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर.	रु.४.११ कोटी
४) ठिबक संच पुरविण्यात येणारी उत्पादक कंपनी	रु.१.६५ कोटी
५) लाभार्थी हिस्सा	रु.१.५८ कोटी
	एकूण रु.१५.८४ कोटी.

या अनुषंगाने जिल्हा कृषी अधिक्षक, यवतमाळ यांनी दि.२६.०२.२०१५ रोजी रु.७.३२ कोटी निधी कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना वर्ग केला आहे.

(२) नाही. ठिबक सिंचन संचाचे दर कृषि विभागने जाहीर प्रगटन देऊन स्पर्धात्मक निविदेद्वारे निश्चित केले आहेत. या योजनेमध्ये शेतक-यांना उत्पादक कंपन्याची निवड करण्याची मुभा आहे.

(३) ठिंबक सिंचन संचाचे दर जाहीर निविदेद्वारे कृषि विभागाने निश्चित केलेले आहेत. विदर्भ सधन सिंचन कार्यक्रम (VIIDP) अंतर्गत लाभधारकांना कंपनी निवडण्याची मुभा आहे. व त्याप्रमाणे जाहीर प्रगटनाद्वारे नामांकीत कंपन्यांची निवड केलेली आहे.

निवड केलेल्या नामांकीत कंपन्यांनी ठिंबक संघाच्या खर्चाचा १०.४४ टक्के हिस्सा उचलण्यास सहमती दर्शविल्यामुळे शासनाची एकुण रु.१.६५ कोटी बचत होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चार वर्षापासून पूर्णत्वाच्या प्रतीक्षेत असलेल्या (वाघोली, जि.पुणे) बाईफ रस्त्यांचे काम अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२४) २३६७६ (१४-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चार वर्षापासून पूर्णत्वाच्या प्रतीक्षेत असलेल्या (वाघोली, जि.पुणे) बाईफ रस्त्यांचे काम अद्यापही पूर्ण झाले नसून नियम डावलून काम सुरु असल्यामुळे रस्त्याच्या कामाबाबत चौकशी करण्याची मागणी माहे, मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार या कामाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच सदर रस्त्यांचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येईल व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) ते (४) रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ अनुसार प्रश्नांकित रस्ता प्र.रा.मा. ५ ते वडजाई रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ९७ असा आहे. सदर रस्त्याची अस्तित्वातील एकूण लांबी ३.७०० कि.मी. आहे. जिल्हा परिषदेकडे निधीची कमतरता असल्याने सदर रस्त्यांची काम ग्रामपंचायतीला लोकवर्गणीतून करण्यास सन २०११ मध्ये जिल्हा परिषदेने मान्यता दिली ०/० ते ०/४२८ कि.मी. लांबीतील जि.प. निधी व लोकवर्गणीतून काम पूर्ण करण्यात आले आहे. ०/५५८ ते १/७८० कि.मी. लांबीतील जमिन वादामुळे रस्त्याची दुरुस्ती करण्यास तेथील जागा मालकानी हरकत केली असल्याने खाजगी लोकवर्गणीतून सुरु केलेले काम बंद पडले आहे. व याबाबत दावा वरिष्ठ न्यायालयात प्रलंबित आहे. उर्वरीत ०/४२८ ते ०/५५८ व १/७८० ते ३/७०० कि.मी. लांबीमधील रस्ता दुरुस्तीचे काम निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

मुरुड तालुक्यातील सावली, आगरदांडो, नांदले,जमुतखार, उसडी,
टोकेखार रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

(२५) २३७२५ (१७-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरुड तालुक्यातील बहुतांशी भागातील रस्त्यांवर खड्डे असल्यामुळे प्रवाशांना प्रवास करतांना असंख्य समस्यांना तोड द्यावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यातील सावली, आगरदांडो, नांदले, जमुतखार, उसडी, टोकेखार आदी रस्त्यांना खड्डे पडून जनजीवन विस्कळीत झाले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पहाणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर रस्त्यांची तात्पुरत्या स्वरुपात किरकोळ दुरुस्ती करुन रस्ते सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.
(३) सदर रस्त्याची प्रत्यक्ष पहाणी जिल्हा परिषदेमार्फत केली असता काही ठिकाणी रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागावर खड्डे पडल्याचे आढळून आले.
(४) व (५) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून रायगड जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ५७३७.४० कि.मी. इतकी आहे सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. मागणीच्या प्रमाणात उपलब्ध होणारा निधी हा अल्प प्रमाणात असतो. उपलब्ध निधीनुसार रस्ते व पूल , दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमांतर्गत सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रायगड जिल्हा परिषदेस रु. १०००.३२ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये रु.३७६.०६ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा परिषदेला सन २०१३-१४ मध्ये रु. १३४०.२६ लक्ष असा एकूण रु.२७१६.६४ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सन २०१५-१६ मध्ये जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिन राहून प्रश्नाधिन रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे घेण्याबाबत जिल्हा परिषदेच्या स्तरावर विचार होवू शकेल.

मौजे दारव्हा (जि.यवतमाळ) येथील दुधगांव ते वाघुळ रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(२६) २४५९१ (१४-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे दारव्हा (जि.यवतमाळ) येथील दुधगांव ते वाघुळ रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत श्री.ओंकार ढबाळे व श्री.रामकुमार यादव या स्थानिकांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.यवतमाळ यांचेकडे दिनांक २१ मे, २०१५ रोजी निवेदन सादर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांसंदर्भात विनंती करुनही अद्यापपर्यंत कुठलीही चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामात गिट्टी व मुरुम टाकून निकृष्ट दर्जाचे काम केल्याबाबत संबंधित निवेदनाव्दारे लक्षात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नाही, हे खरे नाही. निवेदनाच्या अनुषंगाने प्रश्नांकित काम राज्य गुणवत्ता नियंत्रक श्री.व्ही.जी.खडसे यांनी तपासले असून त्यांनी सदर कामाचा दर्जा उत्तम असल्याचा अभिप्राय दिलेला आहे.

या कामासाठी वारलेल्या साहित्याच्या चाचण्या घेण्यात आल्या असून वापरलेल्या साहित्याचा दर्जा निकषानुसार असल्याचे आढळले आहे. त्यामुळे काम निकृष्ट दर्जाचे झालेले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

किनवट (जि.नांदेड) येथे कार्यान्वित असलेल्या पाचही पाटबंधारे उपविभागातील कार्यालयाच्या गैरकारभाराबाबत

(२७) २५९३९ (१७-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील किनवट प्रकल्पातील पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी किनवट येथे कार्यान्वित असलेल्या पाचही पाटबंधारे उपविभागातील कार्यालयाचा गैरकारभार असून अधिकारी/कर्मचारी जिल्ह्याच्या ठिकाणी राहूनच काम करीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील मुख्यालयी न राहणा-या अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करुन त्याच्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद अंतर्गत नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) व लघु पाटबंधारे विभाग, नांदेड अंतर्गत ३ उप विभागीय कार्यालये किनवट मुख्यालयी कार्यरत आहेत. सदर उपविभागीय कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचे नाव व त्यांचा मुख्यालयातील निवास पत्ता खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचे नाव	पदनाम	घरचा पत्ता
नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण), नांदेड अंतर्गत पाटबंधारे उपविभाग, किनवट			
१	श्री.महमंद शहानावज खान	शाखा अभियंता	एफ.एच.पठाण यांचा वाडा, गोकूंदा
२	श्री.व्ही.आर. वाघमारे	सहा, अभियंता श्रेणी-२	राजू नाकीवार यांचा वाडा गोकूंदा
३	श्री.वाय.पी. बावस्कर	सहा, अभियंता श्रेणी-२	साळवे गुरुजी यांचे घर बोधडी

४	श्री.व्ही.पी.शिंदे	वरिष्ठ लिपिक	उत्तम जाधव यांचे घर गोकूंदा किनवट
लघु पाटबंधारे उप विभाग किनवट			
१	श्री.आर.एस.तिवारी	उप विभा. अधि.	श्री.ताटावार यांचा वाडा राजेंद्र नगर किनवट
२	श्री.बी.पी.फुलारी	शाखा अभियंता	राजू नारलावार यांचे घर गोकूंदा
३	श्री.बी.जी.खरात	शाखा अभियंता	राजू नारलावार यांचे घर गोकूंदा
४	श्री.एस.बी. कोचत	वरिष्ठ लिपिक	द्वारा एस.एन. चन्नमनवार घर नं. ७१७ एसव्हीएम कॉलनी बालाजी मंदिरा जवळ किनवट
मध्यम प्रकल्प उप विभाग क्र. २ किनवट			
१	श्री.बी.एस.शिससीकर	शाखा अभियंता	राजू नारलावार यांचे घर गोकूंदा
२	श्री.आर.एम.नेमानीवार	शाखा अभियंता	स्वत:चे घर शिवम कॉलनी
३	श्री.एस.ए.गुडसूरकर	वरिष्ठ लिपिक	एम.एम.वाघमारे यांचे घरी गोकूंदा

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तळेवाडी (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) या गावात रस्त्याची सोय करण्याबाबत

(२८) २७५०२ (१७-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेवाडी (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) या गावात रस्त्याची सोय नसल्यामुळे ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी सदरहू गावात रस्ता नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास आढळून आले, आहे हे खरे आहे,

(२) असल्यास, सदरहू गावात रस्ता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) ग्रामपंचायत वेताळबांबर्डे यांनी प्रश्नांकित रस्ता महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून घेण्याबाबत जिल्हा परिषदेकडे मागणी केलेली आहे.

(२) व (३) प्रश्नांकित रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार वेताळ बांबर्डे पावणाई टेंब तळेवाडी भोगलेवाडी ग्रामीण मार्ग क्र.१७५ असा असून त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/४०० पायावाट स्वरुपाचा कच्च्या मातीचा पृष्ठभाग आहे. १/४०० ते १/८०० कि.मी. लांबीतील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत १/८०० ते २/०० कि.मी. लांबीतील पृष्ठभाग डांबरी आहे.

०/०० ते १/४०० लांबीपैकी १/०० ते १/४०० कि.मी. लांबी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये प्रस्तावित असून उर्वरित लांबीतील मातीकाम, खडीकरण व डांबरीकरण इ.कामे निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

दिवाळवाडी धरणाच्या उर्वरित कालव्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी निधी मिळण्याबाबत

(२९) २८२०५ (१७-११-२०१५). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील दिवाळवाडी धरणाच्या कालव्याची दुरुस्तीच्या कामासाठी सन २००६-०७ व २००७-०८ ते २०१०-११ या वर्षात अधिक्षक अभियंता कोकण पाटबंधारे महामंडळ रत्नागिरी विभाग यांना एकूण किती निधी प्राप्त झाला आहे,

(२) असल्यास, धरणाच्या उर्वरित कालव्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी अद्यापपर्यंत निधी देण्यात आला नसल्याने सदरचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्यामधून शेतकऱ्यांच्या जमिनीला, पिकांना पाणी केव्हापासून सोडण्यात येत आहे,

(४) तसेच डाव्या कालव्यावरील विद्यानगरी येथील अतिक्रमण हटविण्याबाबत कार्यकारी अभियंता रत्नागिरी पाटबंधारे विभाग (द) रत्नागिरी यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू कामाची सद्य:स्थिती काय आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१६) :(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुकयातील दिवाळवाडी धरणाच्या कालव्याची दुरुस्तीच्या कामासाठी सन २००६-०७ व २००७-०८ ते २०१०-११ या वर्षात एकूण ३.१४ लक्ष खर्च करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) प्रकल्पाच्या पूर्णत्वानंतर १९८८ ते १९९६ पर्यंत पाणी देण्यात येत आहे. १९९७ ते सन २००५ पर्यंत धरणाच्या दुरुस्ती अभावी पाणी सोडण्यात आले नव्हते. धरण दुरुस्तीनंतर सन २००६-०७ पासून मागणीनुसार सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत आहे.

(४) व (५) डाव्या कालव्यावरील विद्यानगरी येथील अतिक्रमण हटविण्याबाबत कार्यकारी अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे विभाग (द), रत्नागिरी यांनी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना कळविले होते. जिल्हाधिकारी यांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण प्रतिबंध शासन परिपत्रक दि. १० ऑक्टोबर, २०१३ अन्वये अतिक्रमण हटविण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

जलसंपदा विभागाच्या कनिष्ठ अभियंता पदी पदोन्नती देतांना सेवा जेष्ठता डावलल्याबाबत

(३०) २८४८५ (१४-०१-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या स्थापत्य अभियंता सहाय्यक पदावरून कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती देतांना सेवा जेष्ठता डावलून कनिष्ठ अभियंता पदी पदोन्नती देण्यात आल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी कली आहे काय व चौकशीत काय आढळून आले, तसेच संबंधीतावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कंत्राटी ग्रामसेवक पदावर अनुकंप तत्वावर नियुक्ती देण्याच्या निर्णयाबाबत

(३१) २८६७८ (२०-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामान्य प्रशासन विभागाचे अनुकंपाविषयक शासन निर्णय, जिल्हापरिषद कर्मचाऱ्यांनाही लागू करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार दिनांक २० मार्च, २०१४ रोजीच्या शासन पत्रान्वये कंत्राटी ग्रामसेवक व शिक्षण सेवक पदावर अनुकंप तत्वावर नियुक्ती देता येणार नाही असे सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायासह अनुसरुन सर्व मुख्य कार्यकारी जिल्हापरिषद व विभागीय आयुक्तांना कळविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या कंत्राटी ग्रामसेवक पदावर अनुकंप तत्वावर नोकरी देण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाला उक्त निर्णयावर अंमलबजावणी करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२४-०२-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) अनुकंपा नियुक्ती संदर्भात जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम नियुक्ती प्राधिकारी आहेत त्यामुळे सदर शासन निर्णयातील कार्यपध्दतीची अंमलबजावणी संबंधीत जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून करण्यात येते.

रोहा पंचायत समिती अंतर्गत (जि.रायगड) भातसई ग्रामपंचायतीत इंदिरा आवास घरकुल वाटपात झालेला गैरव्यवहार

(३२) २८७९५ (१४-०१-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोहा पंचायत समिती अंतर्गत (जि. रायगड) भातसई ग्रामपंचायतीत इंदिरा आवास घरकुल वाटपात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायतीने इंदिरा आवास घरकुल निधीचे वाटप करताना ७४ पैकी ३७ लाभार्थींना घरकुल योजनेखाली देयके काढल्याचे या गैरव्यवहारात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गैरव्यवहारात दोषीं असणाऱ्या ग्रामसेवक, गटविकास अधिकारी यांची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०५-२०१६) :(१) व (२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हयात इंदिरा आवास योजनेमार्फत घरकुलांचे वाटप करण्याबाबत

(३३) २९१३४ (१६-०१-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात इंदिरा आवास योजनेमार्फत घरे मिळण्यासाठी सुमारे १७,८४७ लाभार्थ्यांची नोंद झाली असता सन २०१५-२०१६ या वर्षात केवळ १४३ जणांना घरकुलाचे वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार पुणे जिल्ह्यातील सदर इंदिरा आवास लाभार्थ्यांना जागेचा प्रश्न सोडवून घरकुले देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०५-२०१६) :(१) नाही.

तथापि, पुणे जिल्ह्यातील इंदिरा आवास योजनेअंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांपैकी १७,७१९ लाभार्थ्यांना स्वत:ची जागा नसल्याने घरकुलाचा लाभ देता आला नाही. स्वत:ची जागा असलेल्या १४२० लाभार्थ्यांपैकी १३८६ लाभार्थ्यांना घरकुल मंजुर करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, स्वत:ची जागा नसलेल्या लाभार्थ्यांना जागा खरेदी करण्याकरिता प्रति लाभार्थी ५० हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य देण्यासाठी दि.३० डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये "पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हंसराज नगर (जि.बुलढाणा) या भागाचा मौजे जयपूर लांडे या ग्रामपंचायतीमध्ये समावेश करण्याबाबत

(३४) २९१७८ (१४-०१-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हंसराज नगर या परिसरात अनुक्रमे सर्वे नं. १४२, १४४, १४५, १४७, १४८, १४९, १५० या सलग सर्वे नं मध्ये एकूण १८०० लोकवस्ती आहे, या भागाचा मौजे जयपूर लांडे या ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्याबाबत या परिसरातील नागरिकांनी व स्थानिक वि.स.स. लोकप्रतिनिधींनी मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी काढलेल्या अधिसूचना क्र. /कवी/राजस्व-७/ कली /५४४/२०१५ दि. ५/०८/२०१५ वर हंसराज नगर या भागातील नागरिकांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या हरकती नुसार हंसराज नगर हा भाग स्वतंत्र्य ग्रामपंचायत म्हणून घोषित न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर परिसर मौजे जयपूर लांडे या ग्रामपंचायतीत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२४-०२-२०१६) :(१) अंशत: खरे आहे. नमुद सर्वे नं. मधील लोकसंख्या अंदाजे १८०० इतकी आहे. या परिसरातील १४४,१४७,१४८,१४९ हे सर्वे नं. सलग आहेत. मात्र, १४२,१४५,१५० हे सर्वे नं. सलग नाहीत. या भागाचा मौजे जयपूर लांडे या ग्रामपंचायतीमध्ये समावेश करण्याबाबत शासनाकडे मागणी प्राप्त झाली आहे.

(२) व (३) प्रारुप अधिसुचना दि. ५ ऑगस्ट, २०१५ बाबत तीन आक्षेप/हरकती प्राप्त झाल्या असून, प्राप्त तीनही हरकती निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

नव्याने महसुली गाव म्हणून घोषित झालेल्या "खामगांव ग्रामीण" या महसुली गावामध्ये हंसराज नगर या भागाचा समावेश असून शासन निर्णय दि. १२ फेब्रुवारी, २००४ नुसार स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी स्वतंत्र महसुली गाव या घटकाचा विचार करण्यात येत असल्यामुळे हंसराज नगर हा भाग स्वतंत्र ग्रामपंचायत म्हणून घोषित करता येत नाही.

(४) व (५) भौगोलिक सलगतेच्या अभावामुळे हंसराज नगर हा भाग जयपूर लांडे या ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करता येत नाही.

यवतमाळ येथील बेंबळा प्रकल्पाच्या बँक वॉटरवर डेहाणी उपसा सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून ओलीतांचे निर्धारित लक्ष पूर्ण करण्याबाबत

(३५) २९५४१ (१४-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील बेंबळा प्रकल्पाच्या बँक वॉटरवर डेहाणी उपसा सिंचन प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पाच्या माध्यमातून सहा हजार हेक्टरवर ओलीत करण्यात येणार होते, प्रत्यक्षात ओलीत २१० हेक्टरपर्यंतच साध्य झाले असून अनेक झोनमध्ये अद्यापही पाणीच पोहचत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाच्या माध्यमातून ओलीतांचे निर्धारित लक्ष्य पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

डेहणी उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीपथावर असून फेज-२ चे ६५% काम पूर्ण पुर्ण झाले आहे. विमोचकांचे पुढील काम ठिंबक संच कास्तकाराचे स्वखर्चाने बसविणे अभिप्रेत आहे.

पथदर्शी प्रकल्प म्हणून २०१३ हेक्टर करिता ९०% अनुदान विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम व महामंडळातर्फे देण्याचे ठरले आहे. यापैकी १०८२ हे .ची चाचणी पूर्ण झाली असून ९२२ हे. वर लाभधारकांच्या सहमतीने उत्पादक कंपनी मार्फत ठिबक संच बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.यापैकी २०१५-१६ चे रब्बी हंगामात ३१० हेक्टर प्रत्यक्ष सिंचन झालेले आहे.

(२) योजनेच्या ६९६८ हे. पैकी प्रथम टप्प्यातील २०१३ हे. लाभक्षेत्रामध्ये ठिबक संच उभारणी करुन विमोचकापर्यंत जून २०१६ पर्यंत पाणी पोहोचण्याचे उद्दीष्ट आहे. उर्वरित भाग जून, २०१८ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) शेतामधील उभ्या पिकामुळे काम करण्यास कालावधी कमी मिळत असल्यामुळे विलंब होत आहे. तसेच ठिबक सिंचन संच उभारणीकरिता लाभधारक शेतकऱ्यांचे पुरेसे सहकार्य मिळत नाही.

इंदिरा आवास योजनेतील बनावट लाभार्थी म्हणून अनुदान घेणाऱ्यांना रोखण्याबाबत

(३६) ३०२८१ (२२-०१-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा आवास योजनेतील बनावट लाभार्थी म्हणून अनुदान घेणाऱ्यांना रोखण्याकरीता राज्य शासनाने केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणारा निधी “राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना” कक्षाच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०१-०३-२०१६) :(१) नाही.

तथापि, "राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना" या कक्षाची स्थापना इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी करण्यात आली आहे.

(२) इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी “राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना” दि. १६.७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आला आहे.

तसेच केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार PFMS (Public Financial Management System) प्रणाली चालू वित्तीय वर्षापासून अंमलात आली आहे. याकरीता केंद्र व राज्य हिश्यासाठी (६०.४० प्रमाणात) एक व राज्य शासनाच्या अतिरिक्त हिश्यासाठी एक अशी दोन स्वतंत्र बँक खाती उघडण्यात आली आहेत. सदर प्रणालीद्वारे केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सन २०१५-१६ या वर्षापासून PFMS प्रणालीद्वारे इंदिरा आवास योजनेच्या घरकुलांचे हप्ते थेट लाभार्थ्यांच्या बँक/ पोस्ट खात्यात वर्ग केले जात आहेत.

(३) सन २०१५-१६ या वर्षापासून "राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना" व PFMS प्रणालीची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील १२ जिल्हयांसाठी सुरु असलेली मागास क्षेत्र अनुदान निधी योजना (बीआरजीएफ) बंद केल्याबाबत

(३७) ३२४३४ (१६-०१-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००९ केंद्र सरकारने मानव विकास निर्देशांकानुसार राज्यातील १२ जिल्हयांसाठी सुरु केलेली मागासक्षेत्र अनुदान निधी योजना (बीआरजीएफ) बंद केली असल्यामुळे संबंधित १२ जिल्हयांना दरवर्षी ३५ ते ४० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) शासनाने आदेश काढून ही योजना दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी बंद करीत असल्याचे जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नांदेड जिल्हयातील ४९५ गावांमध्ये मागासक्षेत्र अनुदाननिधी (बीआरजीएफ) योजनेतून जलशुध्दीकरण यंत्र बसविण्याच्या प्रस्तावाला मंजूरी मिळालेली होती, त्यासाठी पहिल्या टप्प्यात १६ कोटी १ लक्ष रुपयांचा निधी जिल्हयाला प्राप्त झाला असून त्यापैकी १० कोटी रुपये संबंधित ग्रामपंचायतीच्या खात्यावर आरटीजीएसद्वारे वर्ग करण्यात आले आहेत. इ-टेंडरींग पध्दतीने कार्यारंभा आदेश देण्याची प्रक्रियाही सुरु झाली असताना शासनाने ही योजना बंद करण्याचे जाहीर केल्यामुळे नांदेड जिल्हयातील सदरहू ४९५ गावांमध्ये जलशुध्दीकरण यंत्रणा बसविण्याचे कामही यामुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) केंद्र सरकारने मागसक्षेत्र अनुदाननिधी योजना बंद केल्यामुळे मानव विकास निर्देशांकानुसार मागास असलेल्या जिल्हयांच्या विकासाचा कार्यक्रम यापुढेही चालू ठेवण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने कोणता पर्यायी कार्यक्रम हाती घेतला आहे वा घेण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२४-०२-२०१६) :(१) होय.

(२) होय.

(३) नांदेड जिल्हयातील ४९५ गावांमध्ये मागास क्षेत्र अनुदान निधी (बीआरजीएफ) योजनेतून जलशुध्दीकरण यंत्राची कामे पुर्ण करुन घेण्याच्या प्रस्तावाला शासनाच्या दिनांक २५ मे, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली आहे. तसेच शासनाच्या दिनांक २५ मे, २०१५ रोजीच्या पत्रान्वये माहे, जून २०१६ अखेरपर्यंत सदर काम पूर्ण करण्यास मुदवाढ देण्यात आली आहे.

ग्रामपंचायत स्तरावर ई-निविदा उघडून कामे पूर्ण करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) मानव विकास निर्देशांकानुसार मागास असलेल्या जिल्हयांच्या विकासाचा कार्यक्रम यापुढेही चालू ठेवण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने, चौदाव्या वित्त आयोगांतर्गत तरतूद करण्यात आली आहे.

विदर्भातील महत्वाकांक्षी गोसेखुर्द प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

(३८) ३२४३५ (१४-०१-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील महत्वाकांक्षी गोसेखुर्द प्रकल्पाच्या केंद्र सरकारच्या एक्सिलेरेटेड इरिगेशन बेनिफिट प्रोग्रामअंतर्गत (एआयबीपी) सन २००९ मध्ये राष्ट्रीय प्रकल्प म्हणून निधीसह मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) सदरहू प्रकल्प ५ वर्षात पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने कार्यक्रम आखला असतानाही हा प्रकल्प अद्याप पूर्ण झालेला नसल्यामुळे या प्रकल्पाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना पावसावरच विसंबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व या प्रकल्पावर आतापर्यंत पूर्ण झालेल्या कामाप्रित्यर्थ प्रत्यक्षात किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(४) सदरहू प्रकल्प प्रलंबित असल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) प्रकल्पाची उर्वरित कामे शीघ्र गतीने हाती घेवून प्रकल्प कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) होय.
(२) अंशत: खरे आहे, गोसीखुर्द प्रकल्पाच्या धरणाचे काम पूर्ण झोलेले असून त्यातुन निर्माण झालेल्या जलसाठ्यामधुन टेकेपार उ.सिं.यो. तसेच आंभोरा उ.सिं योजनेतुन सिंचन सुरु आहे. तसेच डाव्या कालव्यातुन सुध्दा सिंचन सुरु आहे.
(३) प्रकल्पाचे धरणाचे काम पूर्ण झाले आहे. तथापी पुनर्वसनाअभावी ४२% पाणीसाठा होत आहे. दोन्ही मुख्य कालव्यांची कामे बहुतांशी पुर्ण झाली आहेत. वितरण प्रणालीची कामे प्रगतीत आहेत. प्रकल्पाच्या घटक योजनेत टेकेपार उ.सि.यो व आंभोरा उर्सियो कार्यान्वित झालेली असून मोखाबर्डी, नेरला उ.सि.यो. प्रगतीत आहे. आसोलामेंढा नुतनीकरणाची कामे प्रगतीत आहेत. प्रकल्पावर ३९४८२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. प्रकल्पावर ऑक्टो २०१५ अखेर रु.८८२४.६९ कोटी खर्च झालेला आहे.
(४) पुनर्वसनाच्या अडचणी, भूसंपादन व नियोजनाप्रमाणे निधी उपलब्ध न होणे ही प्रकल्प प्रलंबित राहणेची सर्वसाधारण कारणे आहेत.
(५) प्रकल्पाची उर्वरीत कामे निधी उपलब्धतेनुसार पुढील ५ वर्षात पुर्ण करण्याचे नियोजीत आहे.

मौजे तिलारी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबत

(३९) ३२५४५ (१४-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तिलारी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील नागरिकांना पाटबंधारे विभागाकडून घरे सोडण्याचा सातत्याने तगादा लागवण्यात येत असल्याने ग्रामस्थांनी विभागीय पाटबंधारे विभागाला बेघर बनविल्यास कुटुंबांसह जलसमाधी घेण्याचा इशारा माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार तिलारी येथील नागरिकांचे योग्य प्रकारे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हा परिषदेच्या अनेक कर्मचा-यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

(४०) ३३३७० (२२-०१-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.आऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषदातील विशेषता नांदेड जिल्हा परिषदेच्या अनेक कर्मचा-यांचे दोन महिन्यापासून वेतन झाले नसल्याने कर्मचारी आर्थिक अडचणीत सापडले असून या कर्मचाऱ्यांचे वेतन तात्काळ न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा या कर्मचा-यांच्या युनियनेने दिला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचा-यांचे पगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२४-०२-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) पंचायतराज सेवार्थ प्रणालीत काही कर्मचाऱ्यांची माहिती समाविष्ट करण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने अशा कर्मचाऱ्यांची वेतन देयके हाताने (Manually) तयार करुन कोषागारास सादर करण्याच्या सुचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या, पंचायतराज सेवार्थ प्रणाली ही नविनच असल्याने त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यामुळे विलंब झाला होता या तांत्रिक अडचणींची व त्रुटींची पुर्तता करुन सर्व कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी, २०१६ पर्यंतचे वेतन अदा झाले आहे.

परभणी जिल्ह्यातील लोअर दुधना प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

(४१) ३३४४८ (२०-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.आऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील लोअर दुधना प्रकल्प मार्गी लावण्याचे आश्वासन मा.अर्थमंत्र्यांनी दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला व मराठवाड्याचा अनुशेष भरुन निघण्यात मोलाचा ठरणाऱ्या या प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) अशा आशयाचे पत्र प्राप्त नाही.

तथापि दि.२४/०८/२०१५ रोजी मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती व अपूर्ण पाटबंधारे प्रकल्प यांचा सर्वागीण आढावा मा.ना.श्री.हरिभाऊ बागडे, अध्यक्ष, विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली व मा.मंत्री वित्त व नियोजन, मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता आणि मराठवाड्यातील सर्व आमदार यांचे उपस्थितीत घेण्यात आला.

या बैठकीत निम्न दुधना प्रकल्पास प्राधान्याने निधी उपलब्ध करुन हा प्रकल्प २ वर्षामध्ये पूर्ण करण्याविषयी चर्चा झाली.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

निम्न तेरणा प्रकल्प, माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा उजवा कालव्यावरील पेठसांगवी, एकोंडी व कवठा येथे पुल बांधण्याबाबत

(४२) ३३७७५ (२०-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न तेरणा प्रकल्प, माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा उजवा कालव्यावरील पेठसांगवी, एकोंडी व कवठा येथे अनुक्रमे कि.मी. १८, २२ व २५ या अंतरावर आवश्यक तेथे पुल बांधणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा कालवा विभाग क्र. २, लातूर यांना दिनांक १ एप्रिल, २०१३ रोजी लेखी पत्राद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितांद्वारे कोणतीच कार्यवाही न झालेल्या कारणाने परिसरातील नागरिकांना विविध गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने निम्न तेरणा उजव्या कालव्यावरील सा.क्र. १८०१३ मी. वरील पुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

सा.क्र. २२२७० मी. व सा.क्र. २४३९८ मी. वरील पुलांचे बांधकाम महामंडळ कार्यालयाने मान्यता प्रदान केली असून क्षेत्रीय स्तरावर अंदाजपत्रक व निविदा प्रक्रिया कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील शिराढोण येथे उपसा जलसिंचनातंर्गत जमिनी कॅनॉलासाठी अधिग्रहण करण्यात आलेल्या शेतक-यांना मोबदला मिळण्याबाबत

(४३) ३३९९३ (२०-०१-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील शिराढोण येथे उपसा जलसिंचना अंतर्गत शिराढोण व भूवाडी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी मागील दोन वर्षापूर्वी कॅनॉलासाठी अधिग्रहण करण्यात आल्या पण सदरहू जमिनीचा मोबदला आतापर्यंत संबंधित शेतकऱ्यांना देण्यात आल्या नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिराढोण परिसराला विष्णुपूरीचे पाणी मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या सुपिक जमिनी दिल्या यामध्ये साखळी क्रमांक ६१६० ते ८१३० हा कॅनाल संबंधित शेतकऱ्यांच्या शेतातून गेल्या असून त्यासाठी मागील वर्षात गुत्तेदाराकडून जमिनीचे खोदकाम केल्यामुळे या जमिनी नापीक झाल्या असून जमिनीचा मोबदलाही मिळत नसल्याने या शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) होय,

नियमित भूसंपदान प्रस्ताव सादर केल्यानंतर वितरीकेचे काम करण्याकरीता संबंधित शेतकऱ्यांनी स्वत:हून संमतीपत्र दिल्यानंतरच प्रत्यक्ष काम सुरु करण्यात आलेले आहे.

(२) नियमित भूसंपादन प्रस्ताव सादर केल्यानंतर वितरीकेचे काम करण्याकरीता संबंधीत शेतक-यांनी स्वत:हुन संमतीपत्र दिल्यानंतरच प्रत्यक्ष काम सुरु करण्यात आलेले आहे. निधी उपलब्धतेनुसार मावेजा वाटपाची कार्यवाही सत्वर करण्यात येईल.

(३) सद्य:स्थितीत भूसंपादन निवाडा जाहीर करण्यात आलेला असून भूसंपादन निवाड्याकरीता रु.४८९.६१ लक्ष निधीची मागणी दि.०१.१०.२०१५ रोजी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालयास क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात आली. सदर प्रकल्पास सन २०१५-१६ मध्ये रु.७०.०० लक्ष ची मंजूर तरतूद असून पूर्ण निधी प्राप्त आहे. सदरील निधीपैकी रु.४०.९३ लक्ष भूसंपदानासाठी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बेबंळा प्रकल्पबाधीत २० गावाच्या नागरी सुविधेच्या दुरुस्ती कामांना निधी देण्याबाबत

(४४) ३४७८४ (१४-०१-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेबंळा प्रकल्पामुळे (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) बाधीत १६ गावांना नवीन २० ठिकाणी पुनर्वसीत करण्यात आले, पुनर्वसनाची कामे चार-पाच वषापुर्वी केलेली असल्याने व गावठाणा जिल्हा परिषदेला हस्तांतरीत करण्यात न आल्याने कामे दुरूस्तीस आल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसीत २० गावाचे कधी पर्यंत जिल्हा परिषदेला हस्तांतरण करण्यात येईल,

(३) असल्यास, पुनर्वसनाची २० गावांना नागरी सुविधेच्या दुरूस्ती कामांना निधी देण्यात येईल काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) यवतमाळ जिल्हयातील बेंबळा प्रकल्पामुळे बाधीत १६ गावांचे पुनर्वसन नविन २० ठिकाणी करण्यात आले, असून नागरी सुविधेची कामे सन २००७ पुर्वी करण्यात आली आहेत. २० गावांपैकी १७ गावांचे हस्तांतरण जिल्हापरिषदेअंतर्गत स्वायत्ता संस्थांना करण्यात आले आहे. उर्वरित बारड, थाळेगाव, पहूर-१ या ३ गावांचे हस्तांतरण जून २०१६ पर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे. नागरी सुविधा ची कामे होवून बराच कालावधी झाल्याने काही ठिकाणी दुरुस्ती करण्याची बाब आढळून येते, हे खरे आहे.

(२) पुनर्वसित २० गावठाणांपैकी १७ गावांचे हस्तांतरण जिल्हा परिषदेस करण्यात आलेले आहे. उर्वरित ३ गावठाणांमध्ये किरकोळ नागरी सुविधेची कामे पुर्ण झाल्यानंतर जुन २०१६ अखेर जिल्हा परिषदेस हस्तांतरण करण्याची नियोजन आहे.

(३) मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक २८/८/२०१५ रोजी प्रकल्प भेटीच्या वेळी आढावा बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार दुरुस्ती आराखडा तयार करण्यात आला असुन मंजुरीस्तव महामंडळाचे दि.२७.१.१६ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास शासनस्तरावर मान्यतेबाबत पुढील मान्यतेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बेबंळा कालव्याच्या अस्तरी करणाच्या कामाबाबत

(४५) ३४८४१ (१४-०१-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) बेंबळा कालवे कळंब व राळेगाव तालुक्यातुन जात असतांना पाटबंधारे उपविभाग राळेगाव असतांना कालवे अस्तरी करण्याचे काम निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या उपविभाग आर्णी या विभागाला देण्यात आल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्णी उपविभाग हा राळेगाव वरून १०० कि.मी. दुर असल्याने कामे पाहण्यासाठी शासनास आर्थिक भुर्दडं पडत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राळेगाव पाटबंधारे उपविभाग असतांना १०० कि.मी. दुर असलेल्या आर्णी या उपविभागाला राळेगाव येथील कालवे अस्तरी करण्याचे काम देण्याची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) मुख्य अभियंता जलसंपदा विभाग अमरावती या कार्यालयाचे आदेश दि.२४/१२/२०१० अन्वये बेंबळा मुख्य कालवा कि.मी. १ ते ११३ मधील संधानक अस्तरीकरणाचे संपूर्ण काम कार्यकारी अभियंता, निम्न पैनगंगा प्रकल्प विभाग, यवतमाळ यांच्याकडे देण्यात आले आहे. तेव्हापासून सदरील काम कार्यकारी अभियंता, निम्न पैनगंगा प्रकल्प विभाग, यवतमाळ अंतर्गत निम्न पैनगंगा प्रकल्प उपविभाग क्र.३ आर्णी मार्फत प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे नाही.

बेंबळा मुख्या कालवा किमी १ ते ११३ मधील संधानक अस्तरीकरणाच्या कामाची देखरेख करणाऱ्या तांत्रिक कर्मचारी/अभियंताचे मुख्यालय कामाच्या सोयीप्रमाणे बदलवण्यात आले असल्याने त्यांना आर्णी येथून प्रवास खर्च देय होत नाही. त्यामुळे शासनास आर्थिक भूर्दंड पडत नाही.
(३) निम्न पैनगगा प्रकल्पाचे काम बंद असल्याने तसेच व या प्रकल्पास धरण विरोधी संघर्ष समितीचा विरोध असल्यामुळे व न्यायालयीन प्रकरणामुळे प्रत्यक्ष काम सुरु होण्याकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने, प्रशासकियदृष्ट्या तांत्रिक कर्मचाऱ्यांचा उपयोग करुन घेण्याकरीता बेंबळा कालवा अस्तरिकणाचे काम निम्न पैनगंगा प्रकल्प विभागामार्फत करुन घेण्यात येत आहे.

बेबंळा प्रकल्पामध्ये बाधीत शेती पोच रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(४६) ३५३२९ (१४-०१-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाभुळगाव (जि.यवतमाळ) बेबंळा प्रकल्पामुळे बाधीत शेती पोच रस्त्याचे काम अपुर्ण राहील्याने शेतक-यानां शेती वहीवाट करणे शक्य झाले नाही त्यामुळे शेतक-याचे नुकसान झाल्याचे दिनांक ७ जुन २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतीपोच रस्त्याचे अपुर्ण काम कधी पर्यंत पुर्ण करण्यात येईल,
(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) कास्तकारांनी दान पत्राद्वारे जमीन उपलब्ध न करुन दिल्यामुळे काही वहिवाट रस्त्यांची कामे अपूर्ण आहेत, हे खरे आहे.
(२) तहसिलदार यांनी कलम -१४३ अन्वये अधिसुचित केलेली वहीवाटी ज्या ठिकाणी केवळ १० फुट रुंदीच्या अधिसुचित केल्या आहेत अशा वहीवाटीमध्ये कमी रुंदीमुळे बांधकाम करणे शक्य

होत नसल्याने अशा शेती पोच रस्त्याची संपूर्ण कामे शेतकऱ्यांनी स्वत:हून दान पत्राद्वारे जमीन दिल्यास पुर्ण होवू शकतील अशा वहीवाटीची बांधकामे अपुर्ण आहेत. कास्तकारांनी दान पत्रे विहित वेळेत दिल्यास जुन २०१६ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) शेतक-यांकडून दानपत्रास प्रतिसाद नसल्यामुळे विलंब होत आहे.

नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत

(४७) ३५७२६ (१४-०१-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील पंचायत समिती कार्यालय नांदगाव अंतर्गत अनेक ग्राम सेवकांची पदे रिक्त असल्यामुळे तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी पूर्ण वेळ ग्राम सेवक नसल्याने ग्राम विकासाची कामे होत नसल्याने विकास कामे प्रलंबित राहत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आलेले आहे,
(३) नांदगाव तालुक्यातील ग्रांम पंचायतीमध्ये स्वतंत्र ग्राम सेवकाची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२६-०२-२०१६) :(१) व (२) नांदगाव तालुक्यासाठी ग्रामसंवकांची ५१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ३९ पदे भरलेली असुन १२ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचा कार्यभार अन्य ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांकडे अतिरिक्त स्वरुपात देण्यात आलेला आहे. त्यामुळे विकासाची कामे प्रलंबित राहत नाहीत.
(३) व (४) जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत कंत्राटी ग्रामसंवकांची रिक्त पदे भरण्याबाबत भरती प्रक्रियेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. नवीन उमेदवारांची नियुक्ती करतांना प्राधान्याने नांदगांव तालुक्यात रिक्त असलेल्या जागेवर उमेदवारांची नेमणूक करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

भंडारा जिल्ह्यातील ईटीयाडोह प्रकल्पाची उंची वाढवून त्याची क्षमता वाढविण्याबाबत

(४८) ३६१०३ (१४-०१-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर परिसरातील भीषण पाणीटंचाई लक्षात घेता शासनाने १०० कोटी रुपये खर्च करुन ईटीयाडोह प्रकल्पाची उंची वाढवून त्याची क्षमता १३०० क्युसेक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्याद्वारे १३०० ऐवजी फक्त ११०० क्युसेक पाणी सोडले जात असून विस्तारीत पाण्याच्या नियोजनासाठी पाणी वाटप संस्थांवर जबाबदारी दिली आहे परंतु प्रशासनाचे पाणी वाटप संस्थांवर नियंत्रण नसल्यामुळे कालव्याची क्षमता असूनसुद्धा शेवटच्या टोकापर्यंत शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे वारंवार केल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी वाटप संस्थांकडून अहवाल मागवून त्यांची चौकशी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

या प्रकल्पाच्या धरणाच्या सांडव्याची उंची सन २००१-०२ मध्ये १.७० मी. ने वाढविण्यात आली त्यामुळे प्रकल्पाच्या पाणी साठ्यात ९३.७१ द.ल.घ.मी. ने वाढ झालेली आहे. सांडव्याचे वाढीव बांधकाम रु. १८६.२३ लक्ष किंमतीमध्ये पुर्ण करण्यात आले.

(२) व (३) नाही.

तथापि अध्यक्ष, गजानन पाणी वापर संस्था कुरुड यांचे दि. निरंक चे निवेदन प्रादेशिक कार्यालयास प्राप्त झाले होते. प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी वेळीच कार्यवाही करुन पाणी वापर संस्थेच्या तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशीम जिल्ह्यातील लघु पाटबंधारे विभागात २६४ पदे मंजूर असताना त्यामधून सुमारे १२७ पदे रिक्त असल्याबाबत

(४९) ३६१७३ (२०-०१-२०१६). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम जिल्ह्यातील लघु पाटबंधारे विभागात २६४ पदे मंजूर असताना त्यामधून सुमारे १२७ पदे रिक्त असल्यामुळे लघु पाटबंधारे विभागांतर्ग ६८ बांधकामाधीन प्रकल्प व ८८ सिंचन प्रकल्प व इतर कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरुन प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निकर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) :(१) होय, वाशिम मंडळाअंतर्गत लघुपाटबंधारे विभाग, वाशिम या विभागात एकूण २६४ मंजूर पदांपैकी १२७ पदे रिक्त आहेत.

तथापि, सिंचन प्रकल्पाची व इतर कामे विभागातील उपलब्ध आस्थापनेद्वारे प्रगतीत आहेत.

(२) व (३) जलसंपदा विभागातील सहायक अभियंता-श्रेणी २ (स्थापत्य) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांसाठी मागासवर्गीय अनुशेषांतर्गत १२६ पदासाठी दि. ७/२/२०१६ ते १०/२/२०१६ या कालावधीत परिक्षा घेण्यात आल्या आहेत. तसेच कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील एकूण १२५६ पदाच्या सरळसगेवा भरती करिता दि. १८/२/२०१५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून सदर पदांसाठी दि. २५/३/२०१६ रोजी परिक्षा घेण्यात येणार आहेत. परिक्षेतून प्राप्त होणाऱ्या उमेदवारांमधुन महसुली विभाग वाटपक नियम २०१५ नुसार रिक्त पदे भरली जातील.

तसेच वित्त विभागाच्या क्र.संकीर्ण-२०१५/ प्र.क्र. ४१/ अर्थ १ दि.२/६/२०१५ च्या परिपत्रकानुसार गट "क" संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५० % किंवा एकूण संवर्गाच्या ४% यापैकी जे कमी असेल इतकी पदे भरणेबाबत अधीक्षक अभियंता व परिमंडळ अधिकारी, अमरावती यांना दि. २१/१२/२०१५ अन्वये निदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

घोडाझरी (ता.चंद्रपूर,जि.नागभीड) कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत

(५०) ३६५७१ (१४-०१-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील नागभीड तालूक्यात येणा-या घोडाझरी प्रकल्पाचा मुख्य कालवा सोनापूर जवळ ४० ते ५० फूट अंतरापर्यंत दिंनाक २ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास फुटून गेल्यामूळे जवळपास २५ ते ३० एकरातील धान पिक पाण्यात बुडाल्याने शेतक-यांचे २५ ते ३० लाख रूपयांचे नुकसान झाले असल्याची दुर्दर्वी घटना माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घोडाझरी प्रकल्प व त्याचे पाणी वाटप करणारे कालवे हे ब्रिटीशांनी बांधले असून आजच्या घडीस १०५ वर्ष झाल्यानंतर सुध्दा अधापही घोडाझरी प्रकल्प व त्याचे कालव्याची दुरूस्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, घोडाझरी प्रकल्प व त्याचे पाणी वाटप करणाऱ्या कालव्याच्या दुरूस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०३-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०२.१०.२०१५ ला साखळी क्र.१३८५० ला मुख्य कालवा फुटुन जवळपास ०.४० हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले, हे खरे आहे.

(२) व (३) नाही.

उपलब्ध निधीनुसार नियमित देखभाल व दुरुस्तीची काम करण्यात येतात. तसेच मुख्य कालवा व वितरण प्रणालीच्या दुरुस्तीचे काम विस्तार व सुधारणा अंतर्गत करण्यात आले असून उर्वरित कामांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षत्रिय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.